# जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रानमळा (ढवळपुरी)

## केंद्र :- ढवळपुरी, तालुका :- पारनेर, जिल्हा :- अहमदनगर

140

जा.क्र. ९० दि. ८/८/२४

प्रती,

मा. निलेशजी लंके साहेब,

खासदार, नगर दक्षिण लोकसभा मतदार संघ,

अहमदनगर.

<u>विषय</u> :- शाळेच्या नवीन दोन वर्गखोल्या मंजूर होणेबाबत.....

<u>अर्जदार</u> :- अध्यक्ष व सचिव शाळा व्यवस्थापन समिती, जि.प.प्रा. शाळा, रानमळा (ढवळपुरी)

महोदय,

वरील विषयनुसार आपणास विनंतीपूर्वक अर्ज सादर करण्यात येतो कि, आमची जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रानमळा (ढवळपुरी) हि इयत्ता पहिली ते चौथी पर्यंत शाळा असून शाळेच्या दोन वर्ग खोल्यांचे बांधकाम सन १९५९ मध्ये झालेले होते. सदर बांधकाम जुने व धोकादायक झाले असल्यामुळे त्यांचे निर्लेखन करण्यात आलेले आहे.

शाळेच्या दोन वर्गखोल्यांचे निर्लेखन झाले असल्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांची बसण्याची गैरसोय निर्माण झाली आहे. तरी शाळेतील विद्यार्थ्यांची गरज लक्षात घेता शाळेतील दोन वर्ग खोल्या तात्काळ मंजूर होण्यासाठी आपल्या पातळीवरून शिफारस व्हावी हि विनंती.

अध्यक्ष सचिव

शाळा व्यवस्थापन समिती

जि.प.प्रा.शा. रानमळा (ढवळपुरी)

ता. पारनेर. जि. अ. नगर

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.),

जिल्हा परिषद अहमदनगर.

**विषय** :- नवीन दोन वर्ग खोल्या मंजूर होणेबाबत....

**अर्जदार** :- मुख्याध्यापक, जि.प.प्राथ.शाळा, रानमळा(ढवळपुरी), ता.- पारनेर.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये जि.प.प्राथ.शाळा, रानमळा (ढवळपुरी), ता.- पारनेर,जि.- अहमदनगर ही शाळा इ. १ली ते ४ थी पर्यंत असून शाळेची आजची पटसंख्या २७ आहे. शाळेसाठी २ शिक्षक मंजूर आहेत. शाळेतील दोन वर्गखोल्यांचे जिल्हा परिषद आदेश क्रमांक कार्या - 4/बांधकाम/६५१/२०२१ दिनांक ०९/०८/२०२१ नुसार निर्लेखन मंजूर आहे. तरी शाळेला नवीन दोन वर्ग खोल्यांचे बांधकाम मंजूर व्हावे हि विनंती.

१५
१३/१०/२२

आपला विश्वासू,

मुख्याध्यापक
जि.प.प्राथ.शाळा, रानमळा(ढवळपुरी)
ता. पारनेर, जि. अहमदनगर

**सोबत** :- १) निर्लेखन मंजूर आदेश प्रत

जिल्हा परिषद अहमदनगर

शिक्षण विभाग प्राथमिक

जिल्हा परिषद आदेश क्रमांक कार्या-4/बांधकाम/ ८५७ /2021

दिनांक 09/08/2021

वाचा:-1) शासन परिपत्रक क्रमांक जिपई 2011/प्र.क्र.198/पंरा/07 दिनांक 9जानेवारी 2012
2) शासन परिपत्रक क्रमांक जिपई 2011/प्र.क्र.198/पंरा/07दिनांक 8 जुन 2012
3) मा.अधिक्षक अभियंता सार्व.बांधकाम मंडळ अ.नगर यांचे कडील पत्र क्र.प्रशा-1/जि.प./2658/21दि.14.7.2021
4) मा.अति.मुख्य कार्यकारी अधिकारी ,जिल्हा परिषद अहमदनगर यांचे कडील मंजुर टिपणी दि.9.8.2021

## -:आदेश:-

अहमदनगर जिल्हयातील कर्जत तालुक्यातील जिल्हा परिषद मालकीच्या मोडकळीस आलेल्या जुन्या धोकादायक शाळा खोल्यांचे बांधकाम ६२ वर्षापुर्वीचे दगड, माती, सिमेंट व विटा यामध्ये केलेले असल्याने सदर इमारती पाडणे कामी मा.अधिक्षक अभियंता सार्वजनिक बांधकाम मंडळ अहमदनगर यांचे प्रमाणपत्रा नुसार व शासन परिपत्रक क्रमांक जिजई 2011 / प्र.क्र.198 / पंरा /07 दिनांक 9जानेवारी 2012 व शासन परिपत्रक जिपई 2011 /प्र-क्र.198/ पंरा/ 07 दिनांक 8 जुन 2012 अन्वये मला प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन मी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अहमदनगर खालील प्रमाणे जिल्हा परिषद मालकीच्या जुन्या धोकादायक मोडकळीस आलेल्या शाळा खोल्या पाडणे स मान्यता देत आहे.

विवरणपत्र

| तालुका | जि.प.प्राथ. शाळेचेनाव | वर्ग खोल्या संख्या | इमारतबांध कामाचेवर्ष | इमारतबांध कामाचे वय | इमारतबांध कामाचाखर्च | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| पारनेर | रानमळा (ढवळपुरी) | २ | १९५९ | ६२ | ५१८८ | सदरचे बांधकाम हे ६२ र्षापुर्वीचे दगड, माती, सिमेंट व विटा या मध्ये बांधलेले आहेत. सदरची इमारत मोडकळीस आली असनती विदयार्थ्यांना बसण्यास धोकादायक आहे. |

वर नमुद केल्याप्रामणे जिल्हा परिषद मालकिच्या मोडकळीस आलेल्या जुन्या धोकादायक शाळा खोल्या पाडणेस खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन परवानगी देण्यात येत आहे.

अटी व शर्ती

1) शाळा -खोल्या पाडणेची जबाबदारी शाळा व्यवस्थापन समिती,गशिअ यांची राहील.
2) विदयार्थ्यांची पर्यायी बैठक व्यवस्था आवश्यक भैतिक सुविधा असलेल्या ठिकाणी करावी.
3) शाळा-खोल्या-जुन्याधोकादायक-मोडकीसआल्याने/आकस्मात घटना घडु नये करिता परवानगी देण्यांत येत आहे.
4) इमारती / वर्गखोल्या पाडण्यासाठी जिल्हा परिषदेकडून अनुदान दिले जाणार नाही.
5) मोडकळीस आलेल्या इमारतीचा आहे त्या स्थितीमध्ये गटविकास अधिकारी, गटशिक्षणाधिकारी व उपअभियंता यांच्या संयुक्त समितीने जाहिर लिलाव करावा. लिलाव झाल्यानंतर लिलाव घेणाऱ्याकडून लिलावाची रक्कम जिल्हा परिषद सेस मध्ये आर-1501 या लेखाशिर्षाखाली जमा करावी.त्यानंतर लिलाव धारकास इमारत पाडण्यांस व निर्लेखित साहित्य घेऊन जाण्यास परवानगी द्यावी.
6) पाडलेल्या इमारतीची नमुना नं.39 या नोंदवहीत नोंद घ्यावी.
7) इमारत पाडणे पुर्वी व नंतरचे फोटोग्राफ्स नस्ती सोबत ठेवावेत.
8) याबाबत अहवाल गटविकास अधिकारी पंचायत समिती व उपअभियंता सा.बा.उपविभाग यांनी संयुक्तपणे वरिष्ठ कार्यालयास सादर करावा.

स्थळप्रतीवर मा.अति.मु.का.अ.यांची स्वाक्षरी असे

( शिवाजी शिंदे )
शिक्षणाधिकारी (प्राथमिक )
जिल्हा परिषद, अहमदनगर

प्रत माहितीस्तव कार्यवाहीसाठी -

१. गटविकास अधिकारी, पंचायत समिती, पारनेर
२. उपअभियंता, जिल्हापरिषद सा.बां. उपविभाग, पारनेर
३. गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,पारनेर
४. मुख्याध्यापक, जि.प. प्राथमिक शाळा, रानमळा ( ढवळपुरी ) ता. पारनेर

पंचायत समिती, पारनेर
17 AUG 2021
आ.भ.क. क.अ. सहा.गविअ गविअ

आवक क्र. ९०९
दिनांक दि. २७/८/२१

Scanned with CamScanner

प्रति,

मा. शिक्षणाधिकारी (प्राथ.),

जिल्हा परिषद अहमदनगर.

**विषय** :- नवीन दोन वर्ग खोल्या मंजूर होणेबाबत....

**अर्जदार** :- मुख्याध्यापक, जि.प.प्राथ.शाळा, रानमळा(ढवळपुरी), ता.- पारनेर.

महोदय,

उपरोक्त विषयान्वये जि.प.प्राथ.शाळा, रानमळा (ढवळपुरी), ता.- पारनेर,जि.- अहमदनगर ही शाळा इ. १ली ते ४ थी पर्यंत असून शाळेची आजची पटसंख्या २९ आहे. शाळेसाठी २ शिक्षक मंजूर आहेत. शाळेतील दोन वर्गखोल्यांचे बांधकाम सन १९५९ साली झालेले असून त्यांची शासकीय वयोमर्यादा संपलेली आहे. सदर इमारत विद्यार्थ्यांना बसविण्यासाठी धोकादायक असल्यामुळे सदर वर्ग खोल्यांचा निर्लेखन प्रस्ताव यापूर्वी पाठविलेला आहे. तरी या २ वर्ग खोल्यांचे निर्लेखन मंजूर होऊन शाळेला नवीन २ वर्ग खोल्यांचे बांधकाम मंजूर व्हावे हि विनंती.

आपला विश्वासू,

मुख्याध्यापक

**जि.प.प्राथ.शाळा, रानमळा(ढवळपुरी)**

ता. पारनेर, जि. अहमदनगर

सोबत :- ३ प्रतीत प्रस्ताव

# शाळा व्यवस्थापन समिती, जि.प.प्राथमिक शाळा, रानमळा च्या दिनांक १४/०६/२०२१ च्या सभेच्या इतिवृत्ताची कामापुरती नक्कल

**विषय क्र. :- ६** नवीन दोन वर्ग खोल्यांचे बांधकाम मंजूर होणे बाबत

**ठराव क्र. :- ६** जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रानमळा शाळेतील दोन वर्ग खोल्यांचे बांधकाम सन १९५९ साली झालेले असून सदर बांधकामाची शासकीय वयोमर्यादा संपलेली आहे. सदर इमारतीचा निर्लेखन प्रस्ताव मंजुरीसाठी जिल्हा परिषदेकडे पाठविलेला असल्याची माहिती समितीचे सचिव श्री नरसाळे सर यांनी उपस्थित सदस्यांना दिली. शाळेसाठी नवीन दोन वर्ग खोल्यांची गरज असल्याचे सर्व सदस्यांच्या चर्चेअंती निश्चित झाले. तरी शक्य तितक्या लवकर नवीन वर्ग खोल्या मंजूर होणे बाबतचा ठराव सर्वानुमते मंजूर करण्यात आला.

ठराव सर्वानुमते मंजूर

<u>सूचक</u> :- श्री. उमेश आबा चौधरी

<u>अनुमोदक</u> :- श्री. बाबासाहेब शिवराम चौधरी

अध्यक्ष सचिव

शाळा व्यवस्थापन समिती

जि.प.प्रा.शा. रानमळा (ढवळपुरी)

ता. पारनेर जि. अ. नगर

॥ आता एकच निर्धार, लोकसहभागातुन ग्रामसुराज्य ॥

स्थापना-१९४१

# ग्रामपंचायत ढवळपुरी

ता.पारनेर जि.अहमदनगर

gpdhawalpuri.parner@gmail.com

उपसरपंच
...तराम शिवाजी कुटे
...५४६८६

सरपंच
डॉ.राजेश किसनराव भनगडे
९९२१००८८३६
dr.rajeshb71@gmail.com

दि. २९/०६/२०२१

## ठराव

ग्रामपंचायत ढवळपुरी येथील दि.०९/०७/२०१८ रोजी झालेल्या मासिक सभा ठराव नं.६/१ ची नक्कल.

**विषय नं.६/१ :-** रानमळा जि.प.प्रा.शाळा इमारतीचे निर्लेखन करून नवीन शाळा खोल्यांची मागणी करणेबाबत....

**ठराव नं.६/१ :-** आपले ग्रामपंचायत ढवळपुरी येथील रानमळा जि.प.प्रा.शाळेच्या दोन खोल्या दगड चुना बांधकाम असून त्यांचे ५० वर्षांपेक्षा जास्त जुने बांधकाम आहे.सदर इमारत पडण्याच्या अवस्थेत असून मुलांना शाळेत बसवणे योग्य नाही. तरी सदर इमारतीचे निर्लेखन करून सदर जागेवर नवीन इमारतीची मागणी करावी असे सर्वानुमते ठरले.

**सूचक** – श्री.अशोक फलके.

**अनुमोदक** – सौ.संगीता चौधरी.

ठराव सर्वानुमते मंजूर.

नक्कल तयार दि.२९/०६/२०२१

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत ढवळपुरी
ता.पारनेर, जि.अहमदनगर

सरपंच
ग्रामपंचायत ढवळपुरी
ता.पारनेर, जि.अहमदनगर

॥ आता एकच निर्धार, लोकसहभागातुन ग्रामसुराज्य ॥ स्थापना-१९४१

# ग्रामपंचायत ढवळपुरी

ता.पारनेर जि.अहमदनगर

gpdhawalpuri.parner@gmail.com


उपसरपंच
...म शिवाजी कुटे
...११५४६८६

सरपंच
डॉ.राजेश किसनराव भनगडे
९९२१००८८३६
dr.rajeshb71@gmail.com


ग्रामपंचायत कार्यालय ढवळपुरी स्था.१९४१ ता.पारनेर, जि.अहमदनगर

दि.२९/०९/२०२१

## दाखला

**सरपंच ग्रामपंचायत ढवळपुरी यांजकडून दाखला देणेत येतो की,**

रानमळा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा इमारतीच्या दोन खोल्या दगड चुना यामध्ये बांधकाम असून, सदर बांधकाम ५० वर्षांपेक्षा जुने आहे. सदर इमारतीचे निर्लेखन करून त्या जागेवर अथवा नवीन बक्षीसपत्र झालेल्या जागेत बांधकाम करणेस ग्रामपंचायतची काहीही हरकत नाही.

हा दाखला दिला असे.

ग्रामविकास अधिकारी
ग्रामपंचायत ढवळपुरी
ता.पारनेर, जि.अहमदनगर

सरपंच
ग्रामपंचायत ढवळपुरी
ता.पारनेर, जि.अहमदनगर

केंद्रप्रमुख कार्यालय,

केंद्र :- ढवळपुरी, ता.- पारनेर.

## केंद्रप्रमुख शिफारस

**विषय** :- नवीन शाळा खोलीचे बांधकाम मंजूर होणेबाबत.....

मा. महोदय,

वरील विषयान्वये विदित करण्यात येते कि, **जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रानमळा, केंद्र :- ढवळपुरी, बीट :- भाळवणी, ता.- पारनेर** या ठिकाणी इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतचे वर्ग चालू असून सध्या शाळेचा पट २९ आहे. शाळेत २ उपाध्यापक मंजूर आहेत. शाळेस २ वर्ग खोल्यांची गरज आहे. प्रत्यक्षात शाळेत ३ वर्गखोल्या असून त्यापैकी २ वर्गखोल्या धोकादायक आहेत.

या शाळेचे बांधकाम सन १९५९ साली झालेले असून शासकीय दृष्ट्या बांधकामाची वयोमर्यादा संपली आहे. उपरोक्त नमूद २ वर्गखोल्यांचा निर्लेखन प्रस्ताव मंजुरीस्तव आहे. निर्लेखन झाल्यानंतर शाळा १ उपलब्ध वर्गखोली व समाज मंदिरात भरवून पर्यायी व्यवस्था उपलब्ध होईल. तरी या शाळेच्या इमारतीचे निर्लेखन झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर नवीन बांधकाम करून मिळण्यास शिफारस करत आहे.

स्थळ :- ढवळपुरी

दिनांक :- 30/8/21

केंद्रप्रमुख
केंद्र-ढवळपुरी,ता.पारनेर
जि. अहमदनगर

केंद्रप्रमुख
केंद्र :- ढवळपुरी, ता.- पारनेर.

शिक्षण विस्तार अधिकारी कार्यालय,

बीट – भाळवणी, ता.- पारनेर

## शिक्षण विस्तार अधिकारी शिफारस

**विषय** :- नवीन शाळा खोलीचे बांधकाम मंजूर होणेबाबत.....

मा. महोदय,

वरील विषयान्वये विदित करण्यात येते कि, **जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, रानमळा, केंद्र :- ढवळपुरी, बीट :- भाळवणी, ता.- पारनेर** या ठिकाणी इयत्ता १ ली ते ४ थी पर्यंतचे वर्ग चालू असून सध्या शाळेचा पट २९ आहे. शाळेत २ उपाध्यापक मंजूर आहेत. शाळेस २ वर्ग खोल्यांची गरज आहे. प्रत्यक्षात शाळेत ३ वर्गखोल्या असून त्यापैकी २ वर्गखोल्या धोकादायक आहेत.

या शाळेचे बांधकाम सन १९५९ साली झालेले असून शासकीय दृष्ट्या बांधकामाची वयोमर्यादा संपली आहे. उपरोक्त नमूद २ वर्गखोल्यांचा निर्लेखन प्रस्ताव मंजुरीस्तव आहे. निर्लेखन झाल्यानंतर शाळा १ उपलब्ध वर्गखोली व समाज मंदिरात भरवून पर्यायी व्यवस्था उपलब्ध होईल. तरी या शाळेच्या इमारतीचे निर्लेखन झाल्यानंतर शक्य तितक्या लवकर नवीन बांधकाम करून मिळण्यास शिफारस करत आहे.

**स्थळ** :- भाळवणी

**दिनांक** :- 30/6/2021

विस्तार अधिकारी (शिक्षण) भाळवणी

एम.ए.बी.एड.

शिक्षण विस्तार अधिकारी [EDI]

बीट - भाळवणी, ता.- पारनेर

ता. पारनेर, जि. अहमदनगर